| | |
|---|---|
| **7.1.11** | ***Institution celebrates / organizes national and international commemorative days, events and festivals*** |
| **QlM** | Describe the efforts of the Institution in celebrating /organizing national and international commemorative days, events and festivals during the year within 200 words |

**Bharat Liberal Education Society's**

## Shri Havagiswami Mahavidyalaya, Udgir-413517
## Dist. Latur
## Commemorative Day Celebration 2022-23

## Every Year the Institute organizes the following commemorative Days.

| Sr. No. | Period | Particulars | Remarks if any |
|---|---|---|---|
| 5. | 22.06.2022 | Commencement of the Admission and Lectures | |
| 6. | 05.06.2022 | Celebration of the world Environment Day | Tree Plantation by Principal Dr. S.N. Shinde |
| 7. | 06.06.2022 | Celebration of Shiv Coronation Day | Speaker: Mr. D.V. Bande |
| 8. | 21.06.2022 | Celebration of the World Yoga Day | All the staff |
| 9. | 02.05.2022 To 16.06.222 | Celebration of the Birth Anniversary of Lokmany Bal Gangadhar Tilak | Speakers: Mr. M.V.Bhalke |
| 10. | 01.08.2022 | Celebration the Death Anniversary of Lakmanya Tilak and Birth Anniversary of Anna Bhau Sathe | Speaker : Prof Dr. S.Y. Chimore Dr. A.R. Kavthale |
| 11. | 12.08.2022 | Celebration of the Birth Anniversary of Rangnathan | Speaker : Mr. A.J. Rangdal |
| 12. | 12.08.2022 | Public Awareness Rally about Azadi ka Amrut Mohotsav | By NSS |

Co - Ordinator, IQAC
Shri Havagiswami Mahavidyalaya
Udgir Dist.Latur

Principal
Shri Havagiswami Mahavidyalaya
Udgir Dist.Latur

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13. | 13.08.2022 | Har Ghar Tiranga Compaign | By NSS | |
| 14. | 15.08.2022 | Celebration of India's Independence Day (Azadi ka Amrut Mohotsav) | Speaker : Dr.D.R. Honrao | |
| 15. | 05.09.2022 | Celebration of the Teachers Day | Speaker : Dr.D.R. Honrao | |
| 16. | 02.10.2022 | Celebration of the Birth Anniversary of Mahatma Gandhi & Lal Bahadur Shastri | Speaker : Mr. M.V. Bhalke | |
| 17. | 03.10.2022 | Commencement of the Winter Examination | | |
| 18. | 15.10.2022 | Celebration of the Birth Anniversary of Dr. A.P. J. Abdul Kalam as the Readers Inspiration Day | Speaker : Dr. V.G. Gore | |
| 19. | 20.10.2022 to 29.10.2023 | Dipawali Vacations | | |
| 20. | 31.10.2022 | Celebration of the Birth Anniversary of Sardar Vallabhbhai Patel as the Integration Day and death Anniversary of Mrs. Indira Gandhi | Speaker : Mr. Shivkumar Hasargunde | |
| 21. | 06.11.2022 | Celebration of the Birth Anniversary of Guru Nanak | Speaker : Mr. Shankareppa Harkare | |
| 22. | 14.11.2022 | Celebration of the Birth Anniversary of Pandit Jawaharlal Nehru | Speaker : Dr.R.A. Kamble | |
| 23. | 15.11.2022 | Celebration of the Birth Anniversary of Birsa Munda | Speaker : Dr.M.L. Bhandare | |
| 24. | 19.11.2022 to 07.12.2022 | Winter Holidays | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 25. | 26.11.2022 | Celebration of the Constitution Day | Speaker : Dr.D.R. Honrao | |
| | 26. | 06.12-2002 | Celebration of the Death Anniversary Dr. Babasaheb Ambedkar | Speaker : Dr.A.R. Kavthale | |
| | 27. | 08.12.2022 | Commencement q the Second Term | | |
| | 28. | 18.12.2002 | Celebration of the Minority Day | Speaker : Mr. J.K. Mulla | |
| | 29. | 03-01-2023 | Celebration of the Birth Anniversary of Krantijyoti Savitribai Phule | Speaker : Miss. J.D. Sampale | |
| | 30. | 12-01-2022 | Celebration the Birth Anniversary of Ma Jijau and Swami Vivekananda | Speaker : Mr. D.V.Bande Dr. M.L. Bhandare | |
| | 31. | 17-01-2023 to 23-01-2023 | College NSS Camp | At. Gudsur Tq. Udgir | |
| | 32. | 23-01-2023 | Celebration of the Birth Anniversary of Netaji Subhash Chandra Bos | Speaker : Dr.A.R. Kavthale | |
| | 33. | 25.01.2023 | Voters Day | Speaker : Dr.Siddewad Ashok | |
| | 34. | 26.01.2023 | Celebration of the India's Republic Day | The Institution | |
| | 35. | 30-01-2023 | Celebration of the Death Anniversary of Mahtma Gandhi | Speaker : Dr.A.A. Kalgapure | |
| | 36. | 15.02.2023 | Celebration of the Birth Anniversary of Saint Sevalal Maharaj | Speaker : Mr.V.I. Pawar | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | 37. | 16.02.2023 | Celebration of the Birth Anniversary Saint Rohidas Maharaj | Speaker : Mr.J.D.Sampale | |
| | 38. | 19.02.2023 | Celebration & the Birth Anniversary Chhatrapati Shivaji Maharaj | Speaker : Mr.Madhukar Musane | |
| | 39. | 23.02.2023 | Celebration of the Birth Anniversary Saint Gandge Maharaj | Speaker : Dr. M.L. Bhandare | |
| | 40. | 28.02.2023 | Celebration of the National Science Day | Speaker : Dr. S.N.Shinde | |
| | 41. | 08.03.2023 | Celebration & the World Women Day | Speaker : Mrs. Meera Shivpuje | |
| | 42. | 12.03.2023 | Celebration of the Birth Anniversary of Yashwantrao Chavan | Speaker : Mr. M.V. Bhalke | |
| | 43. | 22.03.2023 | Commencement of Summer Examination | | |
| | 44. | 23.03.2023 | Celebration of the Martyr Day | Speaker : Dr.D.R. Honrao | |
| | 45. | 11.04.2023 | Celebration of the Birth Anniversary of Mahatma Phule | Speaker : Dr.N.G. Yemekar | |
| | 46. | 14.04.2023 | Celebration of the Birth Anniversary Dr. Babasaheb Ambedkar | Speaker : Dr.D.R. Honrao | |
| | 47. | 16.04.2023 | Celebration of the Birth Anniversary of Lord Gautam Buddha | The Institution | |
| | 48. | 22.04.2023 | Celebration of the Birth Anniversary of Mahtma Basweshwara | Speaker : Mr. B.B. Mashalkar | |


| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 49. | 30.04.2023 | Celebration of the Birth Anniversary Saint Tukdoji Maharaj | Speaker : Mr. M.V. Bhalke |
| 50. | 01.05.2023 | Celebration of the Maharashtra Day | Speaker : Mr. D.V. Bande |
| 51. | 01.05.2023 to 15.06.2023 | Summer Vacation | |

**Provide we blink to :**

- Annual report of the celebrations and commemorative events for the last (During the year)
- Geo tagged photographs of some of the events
- Any other relevant information

यशवंत 'nd MAY 22-5-20
शुक्रवार दिनांक ०३ जुन २०२२ वीर संवत २५४० मार

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात तंबाखू मुक्ती दिन व अहिल्याबाई होळकर जयंती साजरी



उदगीर (प्रतिनिधी) येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात तंबाखू मुक्ती दिन व अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विचार मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य डॉ .संजय शिंदे, उपप्राचार्य डॉ. अप्पाराव काळगापूरे तसेच संस्थेचे कोषाध्यक्ष शंकरेप्पा हरकरे आप्पा वप्रमुख पाहुणे प्रा वसंत पवार आदी मान्यवर उपस्थित होते.


यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे प्रा व्ही आय पवार म्हणाले की ,आज माणसाचे आरोग्य हीच खरी धनसंपत्ती आहे व याकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे कारण आज दैनंदिन जीवनात सर्वच अन्न पदार्थ व दुधामध्ये मोठ्या प्रमाणात केमिकल चा वापर होतो आहे किडनी ,लिव्हर ,ब्रेन किंवा शरीराच्या इतर अवयवावर केमिकलचा घातक परिणाम होत असून आरोग्य सांभाळणे हे आव्हान बनले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करत असताना प्र प्राचार्य डॉ संजय शिंदे म्हणाले की मोठ्या प्रमाणात तंबाखू या व्यसनाचा विळखा समाजाला बसलेला आहे मोठ्या प्रमाणात ग्रामीण आणि शहरी भागात तंबाखू व तंबाखूयुक्त पदार्थ खावून लोकआपले जीवन धोक्यात आणत आहेत मोठ मोठ्या आजारांची संख्या या तंबाखूच्या सेवनामुळे दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे प्रत्येकांनी याची काळजी घ्यावी की, आज तंबाखू समाजातून हद्दपार कशी होईल याचा विचार करण्याची वेळ आपल्या सर्वांवर आलेली आहे त्याचबरोबर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती महाविद्यालयात आपण साजरी करत आहोत त्यानिमित्ताने अहिल्यादेवींच्या शौर्याचा महिलांनी आदर्श घ्यावा त्याच' बरोबर पुण्यश्लोक अहिल्याबाई देवी यांच्याविचारांचा जागर समाजामध्ये होणे आवश्यक आहे जोपर्यंत त्यांचे विचार समाजात खोलवर रुजणारी जाणार नाहीत तोपर्यंत क्रांतीची बीजे रोवली जाणार नाहीत आणि म्हणून अहिल्यादेवींच्या कार्याचा विचाराचा वसा आपण सर्वांनी घ्यावा व तो पुढे चालवावा ही अपेक्षा व्यक्त करतो असे मत अध्यक्षीय समारोप करत असताना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मनोहर भंडारे तर आभार प्रा . डॉ. पंडित देवशेटे यांनी मानले.

Scanned with CamScanner

यशवंत
MAY 31-5-20
गुरुवार दिनांक २८ जुलै २०२२ वीर संवत २५४० म
ज्येष्ठ षष्टी २ शनिवा

# हावगीस्वामीत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी




उदगीर (प्रतिनिधी) श्री हवगीस्वामी महाविद्यालयातलोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे कोषाध्यक्ष श्री शंकरप्पा हरकरे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, उपप्राचार्य डॉ. अप्पाराव काळगापुरे, कार्यालयीन अध- ीक्षक सूर्यकांत धनुरे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

Scanned with CamScanner

यशवंत
ंगळवार दिनांक ०२ ऑगस्ट २०२२ E 1-6-2014

# हावगीस्वामीत अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन



उदगीर (प्रतिनिधी) श्री हावगीस्वामी महाविद्यालयात साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी प्रबोधनात्मक पद्धतीने साजरा करण्यात आली. यावेळी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ड.गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, प्र. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, उपप्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे तसेच मंचावर डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे, डॉ. अमित कवठाळे, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत धनुरे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहाराने अभिवादन करण्यात आले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यविषयी बोलताना डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे एक वैश्विक लेखक होते. श्रम करणाऱ्या माणसांचे जीवन त्यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केले. त्यांच्या साहित्यात चारित्र्यवान व स्वाभिमानी माणसं नायक, नायिका म्हणून आलेली आहेत. एका अर्थाने ते उपेक्षितांचे कैवारी होते.

लोकमान्य टिळकावर बोलताना डॉ.अमित कवठाळे म्हणाले की, लोकमान्य टिळकांनी विविध क्षेत्रात कामगिरी केलेली आहे. धर्माचे अभ्यासक, क्रांतिकारक, महापुरुष म्हणून लोकमान्य टिळकांची महत्त्वाची कामगिरी बजावली.

अध्यक्षीय समारोपात डॉ. एस. एन.शिंदे म्हणाले, जेव्हा जेव्हा समाजात अराजकता माजलेली असते तेव्हा तेव्हा महापुरुष जन्माला येतात आणि समाजाला दिशा देत असतात. महापुरुषांचा आदर्श सगळ्यांनी घेतला पाहिजे.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. म. ई. तंगावार तर आभार डॉ. मनोहर चंद्रे

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com 3
औरंगाबाद, बुधवार, दि. ३ ऑगस्ट २०२२



शाळा, महाविद्यालयात आदरांजली; विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, लोकमान्य टिळक यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : जिल्हाभरात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. शाळा, महाविद्यालयांत विविध कार्यक्रम घेण्यात आले. तसेच विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली.

- उदगीर येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, उपप्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे, डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे, डॉ. अमित कवठाळे, कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत धनुरे, डॉ. म. ई. तंगावार, डॉ. मनोहर भंडारे उपस्थित होते.
- उदगीर येथील ब्राईटस्टार हायस्कूल येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. वीरभद्र घाळे, प्रा. प्रेमा घाळे, डॉ. भाग्यश्री घाळे आदींसह प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.
- उदगीर येथील विद्यावर्धिनी हायस्कूलमध्ये अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक आर. वी. हाडोळे, उपमुख्याध्यापक बाबूराव नागरवाड, राम ढगे, पी. व्ही. अजने, एस. सी. पाटील, एन. आर. जवळे, बाबासाहेब पाटील, पी. जी. काळे, बंडू पाटील लोणीकर, बी. व्ही. बिरादार, ए. पी. पोशेट्टी उपस्थित होते.

रेणापूर तालुक्यातील समसापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच अजित गायकवाड, जिल्हा परिषदेच्या शिक्षण समितीचे माजी सदस्य मंगेश सुवर्णकार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालाजी बारलेकर, सदस्य वसंतदादा फुलशे, विलास चक्रे, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाबासाहेब गरड, मुख्याध्यापिका नंदिनी कुंभार, बब्रुवान बेंबडे, शत्रुघ्न बिराजदार, ज्ञानोबा डुकरे, सुरेखा चंदेले, ग्रामपंचायतचे सदस्य रूपेश दत्त आदींची उपस्थिती होती.

औसा तालुक्यातील चिंचोली तपसे येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच विश्वंभर सुरवसे, उपसरपंच युवराज यादव, महेश पाटील, सदस्य नितीन कवठाळे, प्रवीण कांबळे, सूरज मुळे, माजी सरपंच मारुती नेटके, सेवानिवृत्त सैनिक बब्रुवान सुरवसे, राजेश पाटील, सचिन गरड, पप्पू बिराजदार, आकाश मोरे, दिलीप नेटके, बालाजी शिंदे, पप्पादेवी लांडगे, माधव कांबळे, प्रमोद नेटके आदींसह गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

Scanned with CamScanner

लोकमान

# प्रो. डॉ. ईश्वर शेरे यांना 'भारत विद्यारत्न' पुरस्कार



[उद]गीर (ता.प्र.) येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रो. डॉ. ईश्वर गुरूनाथराव शेरे यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड निर्देशित इंटरनॅशनल बिझनेस कौन्सिल, दिल्लीच्या 'भारत विद्यारत्न' पुरस्कारासाठी निवड झालेली आहे.

प्रो. शेरे यांना बी.एस्सी.ला ओपन मेरिट स्कॉलरशिप प्राप्त झाली होती तर एम. एस्सी. फिजिक्समध्ये संपूर्ण मराठवाड्यातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान प्राप्त झाला होता. फिजिक्स विषयात दोन वेळा नेट परीक्षा पास होणारे मराठवाड्यातील ते एकमेव प्राध्यापक आहेत. यापूर्वी त्यांना कै. चंद्रभागाबाई हिराखान मेडल देऊन जालना येथे गौरविण्यात आले होते. तसेच राजर्षी शाहू महाराज राष्ट्रीय शिक्षक सन्मान [पु]रस्कार व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांचे अनेक शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानांकित जर्नल्समध्ये प्रकाशित आहेत व अनेक सेमिनारमध्ये त्यांनी शोधनिबंधाचे वाचन केले आहे. याची दखल घेऊन भारत सरकारच्या वतीने भारतरत्न डॉ. सी.एन.एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली आयसर, भोपाळ येथे पार पडलेल्या संशोधकाच्या मीटिंगसाठी त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच भारत सरकारने टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, मुंबई येथे दोन महिन्यासाठी त्यांची एका प्रोजेक्टसाठी निवड केली होती. इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स तर्फे वल्लभ विद्यानगर, गुजरात येथे आमंत्रित केले होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, उदगीरचे गेली दहा वर्षापासून कार्याध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. त्यात देखील त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी म्हणून केलेल्या कार्याची दखल पंचायत समिती उदगीरने घेऊन त्यांचा गौरव केला आहे. महाविद्यालयातील नॅक व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संयोजक व सध्या ते महाविद्यालयातील सहकारी पतसंस्थेचे दुसऱ्यांदा चेअरमन म्हणून करीत असलेले कार्य देखील विशेष आहे. ते महाविद्यालयातील विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्व म्हणून सुपरिचित आहेत. या सर्व शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाल्यामुळे त्यांचे भा. लि. ए. सोसायटीचे अध्यक्ष ड. गुणवंतराव पाटील हैबतपूरकर, सचिव उमेश पाटील देवणीकर, उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे व संगमेश्वर जिरगे, सहसचिव प्रभूराव कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे सह संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी व मित्रपरिवाराने त्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.


Scanned with CamScanner

लोकमन

lokmanlatur@gmail.com

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात रंगनाथन जयंती साजरी

उदगीर (ता.प्र.) ग्रंथालयाचे जनक व अभ्यासाक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात साजरा करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र.प्राचार्य डॉ. एस.एन. शिंदे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. आप्पाराव काळगापुरे, ग्रंथपाल प्रा.अजित रंगदळ यांची प्रमुख उपस्थिती होती.



याप्रसंगी ग्रंथपाल प्रा.अजित रंगदळ म्हणाले, एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयाचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास केला. त्या पद्धतीचा वापर आजही देशांमध्ये केला जातो. त्यांनी जी पाच सूत्र सांगितलेली आहेत, ती सूत्र वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी अतिशय महत्त्वाची आहेत. सदरील कार्यक्रमास डॉ. राजेश्वर पाटील, प्रा.धनराज बंडे, डॉ. म.ई.तंगावार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजकुमार बोयने यांनी प्रयत्न केले. आभार प्रा. मनोहर भालके यांनी मानले.

यशवंत लातूर बुधवार दिनांक १९ ऑक्टोबर २०२२

# हावगीस्वामीत अब्दुल कलाम जयंती साजरी




उदगीर (प्रतिनिधी) हावगीस्वामी महाविद्यालय अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून वार्षिक नियोजन समिती व ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यम ाने साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्ही. जी.गोरे उपस्थित होते. त्यांनी अब्दुल कलाम यांच्या जीवनावर मौलिक असे मार्गदर्शन केले, जगामध्ये भारताची प्रतिमा वाढवण्याचं काम अब्दुल कलाम यांनी केले. अब्दुल कलाम म्हणजे लोकांच्या मनातील राष्ट्रपती होय. गरिबीवर विजय प्राप्त करून राष्ट्राला समृद्ध करण्याचं काम त्यांनी केलं. त्यामुळे आम च्यासाठी ते प्रेरणादायी आहेत.शिक्षणाच्या म ाध्यमातूनच त्यांनी जगाला गवसणी घातली. त्यामुळे त्यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी केली जातेआहे. मोबाईल व्हाट्सअप च्या दुनियेम ध्ये वाचन हेच माध्यम आपल्याला समृद्ध करून जाईल वाचनामुळे माणूस घडला जातो,वाढला जातो आणि माणसांमध्ये सभ्यता निर्माण होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की वाचन हेच आपल्याला वाचवील. त्यामुळे वाचाल तर वाचाल. वाचनातून विचार निर्माण होतो विचारातून आपलं जगणं सुंदर होऊन जाते. आपल्या सुंदर जगण्यातून राष्ट्र ही समृद्ध होऊन जाते त्याम ुळे अब्दुल कलाम यांची आठवण ठेऊन आपण वाचन करायला पाहिजे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे हे होते. त्याने बोलताना म्हटले की अब्दुल कलाम यांनी विज्ञान क्षेत्रामध्ये कार्य अतुलनीय असे आहे. ते भारताचे मिसाईल मॅन होते. खरंच, खरे संशोधन हे राष्ट्राला समृद्ध करून जाते. साधी राहणीमान आणि उच्च विचार अब्दुल कलाम यांच्या जीवनाचं गमक होतं ह्यावेळी उप प्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे, प्रा.सुहास कोळीकर, प्रा. प्रदीप जाधव, सौ. निरगुडे, गणेश बिरादार, राजकुमार बोयने हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे व आभार ग्रंथपाल अजित रोदळ यांनी मानले.


Scanned with CamScanner

SATI यशवंत 1-6-2014

मंगळवार दिनांक १ नोव्हेंबर २०२२

# सरदार पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदान


## शिवकुमार हसरगुंडे यांचे प्रतिपादन



उदगीर (प्रतिनिधी) सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदानअसल्याने प्रतिपादन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष तथा भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे यांनी केले.


उदगीर येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे, डॉ. पी. एम. देवशेट्टे, डॉ. आर. व्ही. तानशेट्टे, कार्यालयीन अधिक्षक सुर्यकांत धनुरे, बालाजी सांडवे, नागनाथ केंद्रे, राम राठोड उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना श्री हसरगुंडे यांनी, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी हे होय. त्यांचा त्याग, संगठनकौशल्य, शिस्त, राष्ट्रप्रेम हे अतुलनीय असे होते. इंदिरा गांधी सोबत अत्यंत निस्वार्थपणे आपण कार्य केले आहे. त्यांच्याशी माझा पत्र व्यवहार होता. पंजाबचा प्रश्न त्यांनी अत्यंत बारकाईने हाताला. पाकिस्तान व बांगलादेशच्या विभाजनामध्ये महत्वाची भूमिका घेऊन जगाला आपल्या सामर्थ्याचा परिचय त्यांनी करुन दिला. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे योगदान राष्ट्रीय उभारणीत अतुलनीय असे होते असे ते म्हणाले. प्र.प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी, सरदार पटेल हे लोहपुरुष आणि इंदिरा गांधी आर्यन लेडी होत्या. दोन्हीं कणखर व वास्तव प्रश्नाला उत्तर देणारे नेते होते. कामाला समजून घेणाऱ्या या नेत्यांनी कामाच्या पुढचा विचार करुन राष्ट्राला समृद्ध केले आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिवस साजरा करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे यांनी केले. आभार डॉ. डी.आर. होनराव यांनी मानले.

Scanned with CamScanner



यशवंत
गुरुवार दिनांक १० नोव्हेंबर २०२२
पान ८
उदगीर
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com


# हावगीस्वामीत संत गुरुनानक यांची जयंती साजरी



उदगीर / प्रतिनिधी- श्री हावगीस्वामी महाविद्यालयात संत गुरुनानक महाराज यांची साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भा.लि.ए.सो.चें कोषाध्यक्ष श्री शंकरप्पा हरकरे हे उपस्थित होते. ते म्हणाले की संत गुरुनानक यांनी पारंपारिक जोखडापासून माणसाला मुक्त करुन भक्तिच्या मार्गाने सामाजिक समतेचा संदेश दिला.निती ही सर्वांसाठी सारखी असावी त्यांचवेळी समाजामध्ये समता स्थापित होते.शिख धर्मात दान करण्याची वृत्ती ही संत गुरुनानक यांनी सुरु केली .अन्य धर्मापेक्षा शिख धर्मात स्त्री-पुरुष समता अधिक आहे. हे पाऊल मध्यकाळात संत गुरुनानक यांनी टाकले.मानव कल्याणाचा विचार त्यांनी आचरणात आणला होता .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे हे होते. त्यांनी म्हटले की,संत गुरुनानक यांनी शिख धर्म स्थापन करुन समाजाला स्वाभिमान शिकवला.कष्ट कर[illegible]णे हेच खरे जगणे व भिख मागून खाणे मृत्युसारखे असते.आपल्या उत्पनातील काही हिस्सा गोर-गरीबांना दान करावा हा मानव कल्याणाचा विचार त्यांनी दिला. समता व ममता त्यांच्याकडून शिकावी.

या कार्यक्रमाला भा.लि.ए.सोसायटीचे [illegible] हसरगुंडे,कार्यालयीन अधीक्षक सूर्यकांत धनुरे, बालाजी सांडवे, धनाजी हुसाळे,राजू उपरबावडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स[illegible]चालन डॉ.मनोहर भंडारे त[illegible] आभार डॉ.पी.एन.देवशेट्टे यांनी

# पंडित जवाहरलाल नेहरु जयंती साजरी

उदगीर (प्रतिनिधी) श्री हावगीस्वामी महाविद्यालयात पंडित जवाहरलाल जयंती निमित्ताने जैव तंत्रज्ञान दिन साजरा करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.आर.ए. कांबळे हे होते.त्यांनी म्हटले की जवाहरलाल नेहरू हे विज्ञानवादी हे होते . त्यांच्याच दृष्टितून भारतात आय.आय.टी.सारख्या अनेक संस्था निर्माण झाल्या. त्यांच्याच दृष्टीला उजाळा या हेतुने आपण आज जैव तंत्रज्ञान दिन साजरा करत आहोत. जैवतंत्रज्ञान हा अत्यंत व्यापक आणि मानवी जीवनातील अनेक जैविक समस्यांचे निराकरण करणारा विषय आहे. जैवतंत्रज्ञानातील नवीन नवीन शोध हे मानवी जीवनातील महत्वाचा टप्पा आहे. या क्षेत्रात करियरच्या खूप संध्या आहेत. सदरिल विषयाकडे विद्यार्थीनी अत्यंत गांभिर्याने पाहावे.

या वेळी महाविद्यालयातील उप प्राचार्य यांनी आपले मत मांडतांना म्हटले की ॥ जैव तंत्रज्ञानातील ग्रीन,रेड आणि ब्ल्यू या तंत्रज्ञानात खूप प्रगती झाली आहे त्यामुळे शेतीच्या उत्पादनात खूप मोठी वाढ झाली आहे, परंतु जगाच्या तुलनेने आपल्याला जैवविविधतेमुळे खूप अवकाश आहे. त्या अवकाशाला संधीत रुपांतरित करणे अगत्याचे आहे.॥

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एस.एन. शिंदे हे होते. त्यांनी म्हटले की,॥ अनेक शाखांच्या सहयोगातून जैवतंत्रज्ञान हा विषय विकसित झाला आहे. या शाखेमुळे मानवी जीवन समृद्ध होत आहे. शेतीमध्ये आज जो काही बदल दिसतो आहे तो जैवतंत्रज्ञानामुळेच .या विषयात युरोप सारख्या राष्ट्रामध्ये खूप प्रगती झालीआहे .॥

या वेळी डॉ. डी. आर.होनराव, प्रा.पी.जी. नाभस डॉ. रोहिदास राठोड,डॉ. प्रा.एस.एस.स्वामी प्रा.मधुकर पुलणे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मनोहर भंडारे यांनी तर प्रा.माधव भंडारे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

पुण्य नगरी

# इंदिरा गांधी जयंती साजरी

उदगीर : येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात देशाच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, उपप्राचार्य डॉ. अप्पाराव काळगापुरे, सूर्यकांत धनुरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


सूत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे यांनी केले तर डॉ. म. ई. तंगावार यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

वि. संव
लोकमन
भारतीय ता. ९ आ
R.N. No. ... lokmanlatur@gmail.com
ाडी संवत
ता. ३०-
ऽस्लामी १

# सरदार पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदान

## शिवकुमार हसरगुंडे यांचे प्रतिपादन



उदगीर (ता. प्र.) सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदानअसल्याने प्रतिपादन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष तथा भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे यांनी केले.

उदगीर येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे, डॉ. पी. एम. देवशेट्टे, डॉ. आर. व्ही. तानशेट्टे, कार्यालयीन अधिक्षक सुर्यकांत धनुरे, बालाजी सांडवे, नागनाथ केंद्रे, राम राठोड उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना श्री हसरगुंडे यांनी, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी हे होय. त्यांचा त्याग, संगठनकौशल्य, शिस्त, राष्ट्रप्रेम हे अतुलनीय असे होते. इंदिरा गांधी सोबत अत्यंत निस्वार्थपणे आपण कार्य केले आहे. त्यांच्याशी माझा पत्र व्यवहार होता. पंजाबचा प्रश्न त्यांनी अत्यंत बारकाईने हाताळला. पाकिस्तान व बांगलादेशच्या विभाजनामध्ये महत्वाची भूमिका घेऊन जगाला आपल्या सामर्थ्यांचा परिचय त्यांनी करुन दिला. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे योगदान राष्ट्रीय उभारणीत अतुलनीय असे होते असे ते म्हणाले. प्र.प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी, सरदार पटेल हे लोहपुरुष आणि इंदिरा गांधी आर्यन लेडी होत्या. दोन्हीं कणखर व वास्तव प्रश्नाला उत्तर देणारे नेते होते. काळाला समजून घेणाऱ्या या नेत्यांनी काळाच्या पुढचा विचार करुन राष्ट्राला समृद्ध केले आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिवस साजरा करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे यांनी केले. आभार डॉ. डी.आर. होनराव ...

Scanned with CamScanner

WEDNES लोकमन 241

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात महापरिनिर्वाण दिन साजरा



[illegible] ... सिध्दी होती. ... [illegible] ... देशाला समृद्ध करू शकतो. ... [illegible] ... विविध आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला. देशातील दारिद्र्य कमी करायचे असेल, तर डॉ. ... आर्थिक ... [illegible] ... कार्यक्रमास उपप्राचार्य ... [illegible]


दैनिक राजधर्म

दैनिक राजधर्म

परिस्थितीचा अभ्यास केला. देशातील दारिद्र्य कमी करायचे असेल, तर डॉ. बाबासाहेबांच्या आर्थिक

महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. म.ई. तंगावार तर आभार मंडप्पा चामवंद यांनी मानले.

# सरदार पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदान:शिवकुमार हसरगुंडे



उदगीर,प्रतिनिधी:सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे राष्ट्र उभारणीत मोठे योगदानअसल्याने प्रतिपादन काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष तथा भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे यांनी केले.उदगीर येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती व इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे होते. यावेळी उपप्राचार्य डॉ. ए. ए. काळगापुरे, डॉ. पी. एम. देवशेट्टे, डॉ. आर. व्ही. तानशेट्टे, कार्यालयीन अधिक्षक सुर्यकांत धनुरे, बालाजी सांडवे, नागनाथ केंद्रे, राम राठोड उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना श्री हसरगुंडे यांनी, राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणजे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी हे होय. त्यांचा त्याग, संगठनकौशल्य, शिस्त, राष्ट्रप्रेम हे अतुलनीय असे होते. इंदिरा गांधी सोबत अत्यंत निस्वार्थपणे आपण कार्य केले आहे. त्यांच्याशी माझा पत्र व्यवहार होता. पंजाबचा प्रश्न त्यांनी अत्यंत दारकाईने हाताळला. पाकिस्तान व बांगलादेशच्या विभाजनामध्ये महत्वाची भूमिका घेऊन जगाला आपल्या सामर्थ्याचा परिचय त्यांनी करुन दिला. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांचे योगदान राष्ट्रीय उभारणीत अतुलनीय असे होते असे ते म्हणाले. प्र.प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी, सरदार पटेल हे लोहपुरुष आणि इंदिरा गांधी आर्यन लेडी होत्या. दोन्हीं कणखर व वास्तव प्रश्नाला उत्तर देणारे नेते होते. काळाला समजून घेणाऱ्या या नेत्यांनी काळाच्या पुढचा विचार करुन राष्ट्राला समृद्ध केले आहे. त्यामुळे राष्ट्रीय एकता दिवस साजरा करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे यांनी केले. आभार डॉ. डी.आर. होनराव यांनी मानले.

Scanned with CamScanner

लोकमत

# श्री हावगीस्वामीत अब्दुल कलाम जयंती साजरी

उदगीर (ता.प्र.) येथील हावगीस्वामी महाविद्यालय अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून वार्षिक नियोजन समिती व ग्रंथालयाच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. व्ही.जी. गोरे उपस्थित होते. त्यांनी अब्दुल कलाम यांच्या जीवनावर मौलिक असे मार्गदर्शन केले. जगामध्ये भारताची प्रतिमा वाढवण्याचं काम अब्दुल कलाम यांनी केले.




अब्दुल कलाम म्हणजे लोकांच्या मनातील राष्ट्रपती होय. गरिबीवर विजय प्राप्त करून राष्ट्राला समृद्ध करण्याचं काम त्यांनी केलं. त्यामुळे आमच्यासाठी ते प्रेरणादायी आहेत. शिक्षणाच्या माध्यमातूनच त्यांनी जगाला गवसणी घातली. त्यामुळे त्यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी केली जाते आहे. मोबाईल व्हाट्सअपच्या दुनियेमध्ये वाचन हेच माध्यम आपल्याला समृद्ध करून जाईल. वाचनामुळे माणूस घडला जातो, वाढला जातो आणि माणसांमध्ये सभ्यता निर्माण होते. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की वाचन हेच आपल्याला वाचवील. त्यामुळे वाचाल तर वाचाल. वाचनातून विचार निर्माण होतो विचारातून आपलं जगणं सुंदर होऊन जाते. आपल्या सुंदर जगण्यातून राष्ट्र ही समृद्ध होऊन जाते. त्यामुळे अब्दुल कलाम यांची आठवण ठेऊन आपण वाचन करायला पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.एन. शिंदे होते.

अब्दुल कलाम यांनी विज्ञान क्षेत्रामध्ये कार्य अतुलनीय असे आहे. ते भारताचे मिसाईल मॅन होते. खरंच, खरे संशोधन हे राष्ट्राला समृद्ध करून जाते. साधी राहणीमान आणि उच्च विचार अब्दुल कलाम यांच्या जीवनाचं गमक होतं असे डॉ. शिंदे म्हणाले.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. ए.ए. काळगापुरे, प्रा. सुहास कोळीकर, प्रा. प्रदीप जाधव, सौ. निरगुडे, गणेश बिरादार, राजकुमार बोयने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोहर भंडारे यांनी केले. आभार ग्रंथपाल अजित रंगदळ यांनी मानले.

Scanned with CamScanner

दैनिक
लोकमन

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात शिवजयंती साजरी




उदगीर (ता.प्र.) येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती प्रबोधनात्मक पद्धतीने साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एस.एन. शिंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून इतिहास विभागातील प्रा.मधुकर मुरमे तसेच मंचावर उपप्राचार्य डॉ. अप्पाराव काळगापुरे, स्टाफ सेक्रेटरी डॉ. राजेश्वर पाटील उपस्थित होते. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून या वर्षापासून कवी राजा बढे यांनी लिहिलेले जय जय महाराष्ट्र माझा हे गीत राज्यगीत म्हणून अंगिकारण्यात आले. या गीताचे सादरीकरण डॉ.म.ई. तंगावार यांनी केले. यावेळी बोलताना प्रा.मुरमे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज शूर-वीर तर होतेच, परंतु ते व्यवहारकुशल देखील होते. ज्या काळात इस्लामी सत्तेचे सावट पसरलेले होते. अशा काळात शिवाजी महाराजांनी शक्ती बरोबरच युक्तीचा वापर करून मराठी राज्य टिकविले. अधर्म अनाचार व अत्याचाराच्या विरोधात लढा देऊन राष्ट्रप्रेमाची जाणीव करून दिली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अप्पाराव काळगापुरे व डॉ. बालाजी आचोले यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्र.प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते. कमी काळामध्ये त्यांनी उत्तुंग असे कार्य केले. त्यांच्या विचाराची देशाला आजही खऱ्या अर्थाने गरज आहे. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सुत्रसंचालन

प्रा. मनोहर भालके यांनी केले. आभार डॉ. मनोहर भंडारे यांनी मानले.

Scanned with CamScanner

अग्रावंत 14/03/2023
रमझान ईद / રમઝાન ઈદ
268
TUESDAY 29th JULY 29-7-2014
वि. संवत ... २०७१
... २०१४
भारतीय ता ... ४३५ हि.
ज/

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

उदगीर (प्रतिनिधी) येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात महाराष्ट्राचे भाग्यविधाते स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र: प्राचार्य डॉ. एन. जी.एमेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मनोहर भालके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला यशवंतरावजी चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रा. भालके म्हणाले की स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व असलेले राजकारणी होते. राजकारणात राहूनही समाजकारणाचा कधीही विसर त्यांना पडला नाही. शिक्षण, राजकारण, समाजकारण, कृषी व सिंचन अशा विविध क्षेत्रात त्यांनी अत्यंत महत्वाचे योगदान दिले . महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या राजकारणात एक वेगळी छाप त्यांनी आपल्या कृर्तत्वातून पाडली होती.

अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एन. जी एमेकर म्हणाले की प्रत्येक महापुरुषांच्या जयंती आपण साजरी करतो त्यामागची मुख्य भूमिका म्हणजे अशा कृतत्वान महापुरुषांच्या जीवन कार्यातून आपल्याला काहीतरी प्रेरणा मिळावी आणि आपल्याही हातून काहीतरी विधायक कार्य घडावे या. उदात्त हेतूनेच आपण जयंतीचे कार्यक्रम आयोजित करतो. स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांचे कार्य महाराष्ट्र व देश केव्हाही विसरू शकणार नाही. त्यांनी सुरुवातीच्या काळात पायाभूत क्षेत्रात रचलेला भक्कम पाया यावरच महाराष्ट्राची जडणघडण झालेली दिसून येते. त्यांनी केंद्रात जवळपास सर्वच महत्वाच्या खात्याची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मनोहर भंडारे तर आभार प्रा. संतोष पोतरे यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा डॉ संतोष अनकले, प्रा गणेश बिरादार, बालाजी सांडाळे, राजकुमार उप्परबावडे, राहुल कांबळे व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**झाडे लावा झाडे जगवा**

लोकमन

E.R.NO.LAN/KNP/MHR/13N/2019-2021 RNI lokmanlatur@gmail.com

6-1

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

उदगीर (ता.प्र.) येथील श्री हावीस्वामी महाविद्यालयात अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष शिवकुमार हसरगुंडे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.एन. शिंदे, प्रा. मनोहर भंडारे उपस्थित होते.

यावेळी आयोजित कार्यक्रमात डॉ. मनोहर भंडारे यांनी, विरोधकांमध्ये सुद्धा अटलबिहारी वाजपेयी यांच्याविषयी सहानुभूती होती. त्यामुळे सर्व पक्षातील लोक त्यांचा आदर करीत होते. यावेळी त्यांनी हरिवंशराय बच्चन, पंडित जवाहरलाल नेहरू यांची भावना अटलबिहारी वाजपेयी यांच्या संदर्भात कशी होती हे सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्र. प्राचार्य डॉ.एस.एन. शिंदे यांनी, अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्मदिन हा सुशासन दिन म्हणून साजरा केला जातो. कारण त्यांनी उत्कृष्ट असे प्रशासन केले होते. त्यांच्या प्रशासनाची दखल भारतानेच नाही, तर जगातील अनेक देशांनी घेतलेली आहे असे सांगितले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा.डॉ. म.ई. तंगावार यांनी मानले.

Scanned with CamScanner